# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)
CIN : U45200 MH 1974 SGC 017206
एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६
Email: md@fdcm.nic.in, gm hq@fdcm nic in


क्रमांक:प्रशा/आस्था-५/प्र.क्र.४५७ ४३९ नागपूर,दिनांक 12 MAY 2023

## परिपत्रक

**विषय :- एफडीसीएम लिमीटेड मधील अधिकारी / कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी /कर्मचारी यांना नॅशनल इन्श्युरन्स कंपनीची मेडीक्लेम पॉलीसी लागु करणेबाबत.**

१.० एफडीसीएम लिमीटेड मधील अधिकारी, कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी नॅशनल इनश्युरन्स कंपनी लिमीटेडची मेडीक्लेम पॉलीसी **दिनांक २९.०३.२०२३** पासुन लागु करण्यात आली आहे.

२.० करिता, नॅशनल इनश्युरन्स कंपनी लिमीटेडशी संलग्नीत असलेल्या दवाखान्यात जाऊन तात्काळ कॅशलेस उपचार करुन घेता येईल. कॅशलेस उपचाराच्या मदतीकरीता नॅशनल इन्श्युरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहे.

| **नॅशनल इनश्युरन्स कंपणी लिमीटेडची मेडीक्लेम पॉलीसी** | | | |
|---|---|---|---|
| १ | पॉलीसी क्रमांक | 280400/50/22/10002919 | |
| २ | संकेत स्थळ | geninsindia.com | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक व ई - मेल | | |
| | श्री अश्विन इंगळे | ashwin.ingale@geninsindia.com | ९२२५२३९३०७ |
| | श्री राहुल बागडे | rahulm.bagde@nic.co.in | ८४११८८५९९२ |
| | श्री अजय पारवेकर | nagpurgenis@gmail.com | ९२२५२३९३०६ |
| | **कार्यालय संपर्क** | **nagpur@genisindia.com** | **७१२-२२२५०२९** |

३.० आपले कार्यालयात व आपले अधिनस्त विभागीय व्यवस्थापक कार्यालयात नॅशनल इनश्युरन्स कंपनीच्या मेडीक्लेम पॉलीसीच्यासंदर्भात ' **संपर्क अधिकारी** ' म्हणून नियुक्ती करावी .नियुक्ती केलेल्या संपर्क अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करावी.संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती पश्चात उपचाराच्या मदतीकरीता केवळ संपर्क अधिकारीच नॅशनल इनश्युरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीव्दारे विचारणा करतील व त्यानंतर एफडीसीएम लिमीटेडच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या शंकाचे निरसन करतील, याची दक्षता घ्यावी.

४.० तसेच, नवजात बाळाच्या **जन्मांनतर ३० दिवसाच्या आत** बाळाचे नाव व जन्मतारिखेची माहिती या कार्यालयास सादर करावी.

५.० दि. २८.०३.२०२३ पुर्वीचे वैदयकीय देयक **हे १.०६.२०२३ रोजी पुर्वी** या कार्यालयास सादर करावे.

D‹Mediclaim<General Letters

६.० या परिपत्रका सोबत सहपत्रीत असलेल्या (ई-मेल अन्वये) यादीमधील **Employee Code** बघुन खालील नुमद प्रमाणे E-Card Generate करावे.

- https://www.geninsindia.com या Website वर जावे .
- E-CARD वर Click करावे.
- **280400/50/22/10002919** हा पॉलीसी क्र. टाकुन सहपत्रीत केलेल्या यादीमध्ये **Employee Code** बघुन E-Card Generate करावे.
- महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील किंवा संपूर्ण देशातील दवाखाने शोधावयाचेअसल्यास geninsindia.com या संकेतस्थळाला भेट द्यावी. Network Hospital वर Click करुन त्या शहरातील Hospital शोधावे.

७.० एफडीसीएम लिमीटेडने **३ लाखाकरीता** पॉलीसी संलग्नीत केली असुन रु ३.०० लाख पेक्षा जास्त खर्च झाल्यास वरील उर्वरीत रक्कम **' कॉर्पोरेट बफर '** मधुन भागविण्यात येईल. याबाबत कर्मचाऱ्यास वेगळ्याने काही करण्याची आवश्यकता नाही.केवळ आपले वरीष्ठ कार्यालयातील संपर्क अधिकाऱ्यास याबाबत कळविणे आवश्यक आहे.

८.० एफडीसीएम लिमीटेडने **३ लाखाकरीता** पॉलीसी संलग्नीत केली असुन अधिकारी / कर्मचाऱ्यांसह यांचेवर अवलंबुन असलेले कुटूंबिय सदस्य (Dependent) यामध्ये समाविष्ट असतील त्यांना या पॉलीसीचा लाभ घेता येईल.(पॉलीसी संलग्नीत करतेवेळी कर्मचारी / अधिकारी यांनी लिहुन दिलेले Dependent) यासोबतच वार्षिक आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध आहे. याकरीता नॅशनल इनश्युरन्स कंपनी तर्फे प्रत्येक कार्यालयात रुग्णवाहीका येऊन अधिकारी / कर्मचारी यांची तपासणी केली जाईल.

उपरोक्त नमूद संपुर्ण माहिती हि प्रत्येक कर्मचारी / अधिकारी यांचे पर्यंत पोहचवण्याची कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी. सर्व नियंत्रक अधिकारी यांनी त्यांचे अधिनिस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना ई-मेलवर पाठविण्यात येणा-या Employee Code ची यादी हस्तांतरित करावी.

सहपत्र-वरीलप्रमाणे (ई-मेलद्वारे)

(संजीव गौड)
**महाव्यवस्थापक (मुख्यालय)**

प्रति,

महाव्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड
नागपूर, प्रदेश नागपूर.

प्रादेशिक व्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड (सर्व)

प्रतिलीपी :- विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
प्रतिलीपी :- कक्ष प्रमुख (सर्व)
प्रत :- व्यवस्थापकीय संचालक कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी (सर्व)
प्रत- सुचना फलक
प्रत-एफडीसीएम संकेतस्थळ

D:Mediclaim<General Letters